1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

SUBSCRIBE

• वर्ष : ०३ • अंक : १७६ • पुणे • रविवार, दि. १५ मार्च २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313


## ठळक बातम्या

### कासारवाडीतील गॅस एजन्सीवर छापा

पिंपरी (आरंभ पर्व) : इस्त्रायल – अमेरिका आणि इराण युद्धामुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईचा गैरफायदा घेऊन जिल्ह्यात गॅस सिलिंडरची साठेबाजी आणि काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. अन्न पुरवठा विभागाने शुक्रवारी कासारवाडी येथील एका गॅस एजन्सीवर टाकलेल्या छाप्यात गॅस एजन्सी शेजारील एका गोदामात अवैधपणे गॅस सिलिंडरचा साठा केल्याचे समोर आले. या छाप्यात ५४ भरलेले आणि २०७ रिकामे सिलिंडर जप्त करण्यात आले. पिंपरी-चिंचवड शहर आणि जिल्ह्यामध्ये सध्या व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे अनेक हॉटेल आणि रेस्टॉरंट चालकांनी चोरट्या मार्गाने घरगुती गॅसचा वापर सुरू केल्याच्या तक्रारी पुरवठा विभागाकडे आल्या आहेत. घरगुती ग्राहकांकडूनदेखील गॅस सिलिंडर वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी असून, नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

### धायरीत लाकडी बॅटने मारहाण

खडकवासला (आरंभ पर्व) : लाकडी बॅटने मारहाण करून एका तरुणाचा खून केल्याची घटना धायरीतील दळवीवाडी परिसरात घडली. याप्रकरणी नांदेड सिटी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विशाल प्रशांत हबीब (वय २८, रा. बारंगणीमळा, धायरी) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिस निरीक्षक अतुल भोस यांनी दिलेल्या माहितीनुसार, धायरी डीएसके रस्ता ते दळवीवाडी फाट्याजवळ ११ मार्च रोजी रात्री मुख्य रस्त्यालगत ही घटना घडली. याप्रकरणी त्याचा भाऊ प्रथमेश प्रशांत हबीब (वय २६) यांनी फिर्याद दिली. आदित्य उमाप (रा. पुणे) या संशयितावर गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून लाकडी बॅटचे तुकडे, रक्ताचे नमुने आणि दुचाकी जप्त केली. पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रेय सावंत पुढील तपास करीत आहेत.

### बेशिस्त वाहतूक बेलगाम; दंड वसूल

पुणे (आरंभ पर्व) : शहरातील वाहतूक शिस्तीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. वाहतूक पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर कारवाई केली, दंडही आकारला; तरीही रस्त्यांवरील बेशिस्तीला लगाम बसला नाही. दुसरीकडे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, पायाभूत सुविधा अपुऱ्या आहेत. वाहतूक पोलिसांकडे अत्याधुनिक यंत्रणा, पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही. एआय आधारित स्मार्ट ट्राफिक प्रणालीचा प्रस्ताव अजूनही मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. परिणामी वाहतूक व्यवस्थेवरील ताण वाढत असून, या प्रश्नाकडे राज्य सरकारने लक्ष देण्याची गरज आहे.पुणे शहरात रस्ते तेच आहेत; पण वाहने अनेक पटींनी वाढली आहेत. त्यातच बेशिस्त वाहनचालकांमुळे परिस्थिती अधिकच बिघडत आहे. सिग्नल तोडणे, नो-एंट्रीतून वाहन चालवणे, मद्यसेवन करून वाहन चालविणे, चुकीच्या दिशेने धोकादायक पद्धतीने वाहन चालवणे, ट्रिपल सीट आणि मोबाइलवर बोलत वाहन चालवण्याचे प्रकार रोजचे झाले आहेत. शहरात एआय आधारित वाहतूक नियंत्रण प्रणाली सुरू झालेली नाही. वाहतूक व्यवस्थापनासाठी इंटेलिजंट ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टम (आयटीएमएस) आणि इंटिग्रेटेड ट्राफिक बूथ पोलिसिंग सिस्टम (आयटीबीपीएस) यासारख्या आधुनिक यंत्रणांची गरज आहे. तरी त्या अद्याप पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झालेल्या नाहीत.

# ऐतिहासिक शनिवारवाडा सात मजली करा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठा साम्राज्याचा झेंडा अटकेपार फडकाविणाऱ्या श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या पराक्रमाचे प्रतीक असलेला शनिवारवाडा आज भग्नावस्थेत उभा आहे. १८२८ साली लागलेल्या भीषण आगीत शनिवारवाड्याचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर त्याचे मूळ वैभव हरपले. राज्यातील गडकिल्ल्यांचे संवर्धन, जतन करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्याच धर्तीवर शनिवारवाड्याला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी सात मजली उभारावा, अशी मागणी आमदार हेमंत रासने यांनी विधानसभेत केली आहे. शनिवारवाडा ही ऐतिहासिक वास्तूचे गेलेले वैभव पुन्हा प्राप्त होणे गरजेचे आहे. यासाठी केंद्र



तसेच राज्य सरकारच्या पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे. इतिहासाची साक्ष देणाऱ्या शनिवारवाड्याचा विकास होणे आवश्यक आहे. यासाठी पुन्हा सात मजली शनिवारवाड्याची वास्तू निर्माण झाली पाहिजे, अशी भूमिका आमदार रासने यांनी सभागृहात मांडली. कसबा मतदारसंघातील विविध प्रश्नांकडे आमदार रासने यांनी विधानसभा सभागृहातील सभासदांचे लक्ष वेधले. शनिवारवाडा–स्वारगेट तसेच सारसबाग–शनिवारवाडा या प्रस्तावित भुयारी मार्गांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तातडीने तयार करून पुणे शहरातील पहिला भुयारी मार्ग प्रत्यक्षात आणावा, तसेच मामलेदार कचेरी परिसरात थोर क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून आवश्यक तरतूद करण्यात यावी, अशी मागणी रासने यांनी केली.

शहराचा मूळ गावठाण भाग असलेल्या कसबा मतदारसंघात शेकडो जुने वाडे आहेत. मात्र युडीसीपीआर नियमावलीतील काही जाचक अटींमुळे या वाड्यांच्या पुनर्विकास प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण होत आहेत. शनिवारवाड्याच्या आजुबाजुच्या परिसरात राहणाऱ्या इमारतींना पुर्नविकास करताना अनेक अडचणी आहेत. त्यामुळे रहिवाशी हवालदिल झाले आहेत.

या भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने तातडीने या नियमावलीत आवश्यक त्या सुधारणा करण्याची गरज आहे. तसेच मतदारसंघातील महापालिका कर्मचाऱ्यांच्या वसाहतींमधील अनेक इमारती जीर्ण व धोकादायक अवस्थेत आहेत. या पार्श्वभूमीवर नगरविकास विभागाच्या माध्यमातून त्यांच्या पुनर्विकासाचा प्रकल्प तातडीने हाती घेण्याची आवश्यकता असल्याची भूमिका रासने यांनी विधानसभेत मांडली.

### मुख्यमंत्र्यांचे काम महाराष्ट्र घडविण्याचे

**त्रिशूल चित्रपटात नायक असणाऱ्या अमिताभ बच्चन प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द आणि धडाडीच्या बळावर प्रगती करून दाखवली. त्याचप्रमाणे १९८३ च्या विश्वचषकात कठीण परिस्थितीत नाबाद १७५ धावांची तडाखेबाज खेळी करत कपिल देव यांनी भारताला ऐतिहासिक विजय मिळवून दिला. त्याच धर्तीवर आव्हानात्मक परिस्थितीतही ठाम नेतृत्व आणि दूरदृष्टीच्या बळावर विकसित महाराष्ट्र घडवण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत असल्याची भावना यावेळी हेमंत रासने यांनी व्यक्त केली.**

## प्रश्नपत्रिका प्रसारित केल्याप्रकरणी कारवाई; चंद्रपूरमधून एकाला अटक

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

दहावीच्या परीक्षेत गणित भाग – १, तसेच गणित भाग – २ या विषयांच्या प्रश्नपत्रिका समाज माध्यमात प्रसारित केल्याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी चंद्रपूरमधील एका तरुणाला अटक केली. दहावीची प्रश्नपत्रिका फुटली असल्याचा दावा करणाऱ्या तरुणाने पैसे उकळण्यासाठी हा प्रकार केल्याचे उघडकीस आले. दहावीच्या परीक्षेत गणिताची प्रश्नपत्रिका प्रसारित झाल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. पुणे पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून संबंधित प्रकार पेपरफुटीचा नसून, परीक्षार्थ्यांची दिशाभूल करून पैसे उकळण्याचा डाव असल्याचे उघडकीस आणले. 'या प्रकरणात पोलिसांनी तांत्रिक तपास करून एका १८ वर्षीय तरुणाला अटक केली. तो मूळचा चंद्रपूरमधील आहे,' अशी

• **पैसे उकळण्यासाठी कृत्य**

माहिती शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर यांनी दिली. दहावीच्या परीक्षेतील गणित विषयाच्या प्रश्नपत्रिका समाज माध्यमात प्रसारित झाल्याची तक्रार पोलिसांकडे करण्यात आली होती. तपासात पोलिसांना प्रश्नपत्रिकेच्या बदल्यात पैसे मिळविण्यासाठी आरोपीने वापरलेला एक 'क्यूआर कोड' मिळाला. हा कोड पोलिसांनी 'स्कॅन' केला, तेव्हा आरोपीचे नाव समजले. त्यानंतर पोलिसांनी ऑनलाइन व्यवहार करणारी कंपनी, तसेच समाज माध्यम कंपनीकडून तांत्रिक माहिती मिळवली. तरुण मूळचा चंद्रपूरमधील असल्याची माहिती पोलीस कर्मचारी तेजस चोपडे, गणेश जाधवर यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांचे पथक चंद्रपूरला रवाना झाले.

## स्मार्ट सिटीचे काम समाधानकारक नाही; आयुक्तांची खंत




**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

'स्मार्ट सिटीचे कामकाज समाधानकारक पद्धतीने झाले नाही. प्रकल्पाची पुरेशा क्षमतेने अंमलबजावणी झाली नाही, याची खंत आहे. संपूर्ण शहरासाठी काही प्रकल्प होते. काही प्रकल्प पूर्णत्वाकडे आहेत. अनेक पायाभूत सुविधा तयार झाल्या आहेत. पण, वापरात आल्या नसल्याची खंत', महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी व्यक्त केली. स्मार्ट सिटीच्या कामकाजाची माहिती महापालिका सभेत देतानाआयुक्त हर्डीकर म्हणाले, 'स्मार्ट सिटी आणि महापालिका अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नाही. स्मार्ट सिटीच्या कामाच्या चौकशीसाठी तीन सदस्यीय समिती नियुक्त केली असून ३१ मार्चपूर्वी अहवाल मागवला आहे. भविष्यात स्मार्ट सिटी बंद झाली तरी त्यांनी राबविलेले प्रकल्प महापालिका चालविणार आहे. स्मार्ट सिटी कंपनी सुरू ठेवायची की नाही, हे महापालिका सभागृहाने ठरवायचे आहे. चुकीचे काम करणाऱ्यांना कामावरून काढले जाईल. सल्लागार चुकला असेल तर त्याच्यावर कारवाई केली जाईल'. 'स्मार्ट सिटीने आतापर्यंत केलेल्या कामांची माहिती द्यावी. चुकीची कामे करणाऱ्यांवर कारवाई व्हावी', अशी जोरदार मागणी सर्वपक्षीय नगरसेवकांनी केली.

'स्मार्ट सिटीचे कोणतेही काम गेल्या चार वर्षांत पूर्णत्वाकडे गेले नाही. प्रत्येक मिटींगमध्ये आम्हाला वेगवेगळ्या स्वरूपाचे मस्त शहर दाखविले होते. प्रत्यक्षात काहीच झाले नाही. गेल्या नऊ वर्षात प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदांची माहिती द्यावी. स्मार्ट सिटीच्या माध्यमातून झालेल्या सर्व कामांची श्वेतपत्रिक काढावी', अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक प्रमोद कुटे यांनी केली. ८० टक्के सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

'पिंपरी-चिंचवड शहरात स्मार्ट सिटीच्या नावाखाली एक हजार कोटी रुपयांची कामे झाली आहेत. अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली मोठे रस्ते छोटे केले. सायकल ट्रॅक केले. रस्ते अरुंद झाल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. अतिशय चुकीची कामे झाली आहेत. या कामांची देखभाल कोण करणार, त्याची जबाबदारी कोण घेणार आहे. स्मार्ट सिटीचा नियोजन शून्य कारभार असून त्यावर नियंत्रण ठेवण्याची मागणी', शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांनी केली.

### आक्षेपानंतर कोल्हाळे यांनी मागितली माफी

**स्मार्ट सिटी विषयावरील चर्चेत राष्ट्रवादी काँग्रेसचे अनंत कोल्हाळे यांनी 'स्मार्ट बायको' शब्दप्रयोग केला. त्याला महिला नगरसेविकांनी आक्षेप घेतला. महिलांचा अवमान खपवून घेतला जाणार नसल्याचे सुनावले. त्यानंतर कोल्हाळे यांनी शब्द मागे घेऊन सभागृहाची माफी मागितली.**

## चार वर्षे बंद सभागृह सुरू होताच लाखोंचा खर्च !

### देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी स्थायी समितीत कोट्यवधी रुपयांच्या खर्चाचे प्रस्ताव मान्य

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिकेच्या नवीन विस्तारीत इमारतीमधील मुख्य सभागृहात डिजिटल ऑडिओ कॉन्फरन्स सिस्टीमची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी महापालिकेने तब्बल ६२ लाख ८५ हजार रुपयांचा खर्च केला आहे.तसेच महापालिकेतील पदाधिकाऱ्यांच्या दालनांच्या दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च महापालिका प्रशासनाकडून केला जात आहे. महापालिकेमध्ये निवडणूक होऊन सभासद आले आहेत. प्रत्येक पक्षाला महापालिकेकडून कार्यालय देण्यात आले आहे. या कार्यालयात दुरुस्तीची जोरदार कामे सध्या महापालिकेत सुरू आहेत. पदाधिकाऱ्यांच्या मागणीवरुन ही दुरुस्तीची कामे केली जात असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. महापालिकेतील प्रशासक राज संपुष्टात येऊन चार वर्षानंतर सभासद महापालिकेत दाखल झाले आहेत. गेल्या चार वर्षापासून प्रशासक राज असताना महापालिकेचे




मुख्य सभागृह बंद होते. मात्र आता याच सभागृहात तब्बल ६३ लाख रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. तसेच महापालिकेचे प्रवेशद्वाराचे सुशोभिकरण, तसेच महापालिकेतील पदाधिकाऱ्यांच्या दालनांचे सुशोभिकरणासाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीच उधळपट्टी सुरु करण्यात आली आहे. महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत सर्वसाधारण सभेच्या सभागृहामध्ये 'डिजिटल ऑडिओ कॉन्फरन्स सिस्टीम'ची देखभाल, दुरुस्ती तसेच संबंधित विद्युत कामे करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या कामामध्ये मायक्रोफोन, वायरलेस मायक्रोफोन, ॲम्प्लिफायर, डिस्ट्रीब्युशन यंत्रणा, स्पीकर्स तसेच ऑडिटोरियम ऑडिओ सिस्टीमचे सर्व्हिसिंग करण्याचा समावेश आहे. तसेच सुमारे २ कोअर शिल्डेड वायर आणि १.५ स्क्वेअर मिमी स्पीकर वायर बसविण्याचे कामही केले जाणार आहे. या कामासाठी विद्युत विभागाने सुमारे ६३ लाख ८४ हजार रुपयांचा अंदाजपत्रक तयार केले होते. यासाठी निविदा काढण्यात आल्या. यामध्ये काही टक्के कमी निविदा आल्याने ६२ लाख ८५ हजार रुपयांचा खर्च करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत मंजुर करण्यात आली. महापालिकेचे सर्वसाधारण सभागृह चार वर्षे बंद होते. असे असतानाही त्यावर इतक्या मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आल्याने याची उलटसुलट चर्चा महापालिकेत सुरु झाली आहे. सर्वसाधारण सभा होत असलेल्या सभागृहात ही यंत्रणा काही वर्षापूर्वीच बसविण्यात आली होती. मग दुरुस्तीसाठी उधळपट्टी करण्याचे कारण काय? असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

### कार्यालयांची डागडुजी सुरू

**महापालिकेचा कारभार सुरू झाल्याने पालिका प्रशासनाने पदाधिकाऱ्यांस राजकीय पक्षांना कार्यालय दिली आहेत. या कार्यालयाचे सुशोभीकरण केले जात आहे. यामध्ये सभागृह नेत्यांसह इतर राजकीय पक्षांच्या गटनेत्यांच्या कार्यालयांचा समावेश आहे. या सुशोभीकरणावर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जात आहे. सभागृहात बसण्याची दिशा ठरविण्यापासून ते प्रवेशद्वार कुठे असावे यानुसार हे सुशोभीकरण केले जात आहे.**

## पुण्यात आणखी एक आयटी पार्क!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक कोंडी आणि अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे आयटी कंपन्यांचे स्थलांतर होत आहे. ते रोखण्यासाठी पुण्यात नवीन आयटी पार्क उभारण्यात येणार आहे. हा आयटी पार्क पुरंदर येथे उभारण्याचे पाऊल पडले आहे. याप्रकरणी उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी विधानसभेत मोठी घोषणा केली आहे. महसूल विभागाची प्रक्रिया पूर्ण होताच आयटी पार्कसाठीची प्रस्तावित जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) हस्तांतरित करून प्रकल्पाची कार्यवाही जलदगतीने केली जाईल, असे त्यांनी जाहीर केले. पुण्यातील हिंजवडी आयटी पार्क परिसरात वाढती वाहतूक कोंडी आणि अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे काही मोठ्या आयटी कंपन्यांचे स्थलांतर होत असल्याची बाब विधानसभेत मांडण्यात आली. कंपन्यांचे स्थलांतर रोखण्यासाठी पुरंदर तालुक्यातील दिवे, कोडीत आणि चांबळी परिसरातील गायरान जमीन आयटी पार्कसाठी हस्तांतरित करण्याबाबत सरकारची भूमिका काय, अशी



लक्षवेधी सूचना आमदार विजय शिवतारे यांनी विधानसभेत मांडली होती. त्यावर उद्योगमंत्री सामंत यांनी ही माहिती दिली. यावेळी झालेल्या चर्चेत राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनीही सांगितले की, पुण्याच्या भौगोलिक स्थितीचा विचार करता पुरंदर हा आयटी पार्कसाठी योग्य पर्याय आहे. उद्योग विभागाच्या २०२५ मध्ये झालेल्या बैठकीत याबाबत प्राथमिक निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार १५ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला असून यावर्षी २७ फेब्रुवारीला उद्योग विभाग व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी महसूल विभागाकडे ५७२ हेक्टर महसुली जमीन हस्तांतरित करण्याची मागणी केली आहे. ही शासनाची महसुली जमीन असल्याने ती उपलब्ध झाल्यास प्रकल्पासाठीचा खर्चही कमी होणार आहे.

## हॉटेलांची आता अखेरची घटका : सिलिंडर न मिळाल्यास १० ते १५ टक्के हॉटेल बंद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

व्यावसायिक वापराच्या एलपीजी सिलिंडरचा पुरवठा बंद करण्यात आल्याने हॉटेलांना फटका बसू लागला आहे. शहरातील १० ते १५ टक्के हॉटेल बंद झाली आहेत. अनेक हॉटेलचालकांनी खाद्यपदार्थांची संख्या कमी करून आणि इतर इंधन पर्यायांद्वारे व्यवसाय सुरू ठेवण्याची कसरत सुरू ठेवली आहे. पुढील दोन ते तीन दिवसात एलपीजी सिलिंडर पुरवठा न झाल्यास सर्वच हॉटेलांसमोर व्यवसाय बंद करण्याशिवाय कोणताही पर्याय उरणार नाही. याबाबत नॅशनल रेस्टॉरन्ट असोसिएशन ऑफ इंडियाच्या पुणे चॅप्टरच्या अध्यक्षा सायली जहागीरदार म्हणाल्या, की केंद्र सरकारने हॉटेल व्यवसायासाठी एलपीजी




सिलिंडरचा पुरवठा करण्याचे जाहीर केले आहे. प्रत्यक्षात कंपन्यांनी याबाबत अद्याप आदेश आले नसल्याचे कारण पुढे केले आहे. हॉटेल व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर आहे. सध्या शहरातील १० ते १५ टक्के हॉटेल बंद झालेली आहे. अनेक हॉटेलचालक विजेची शेगडी आणि इतर इंधन पर्यायांकडे वळले आहेत. मात्र, त्यावर पूर्ण क्षमतेने व्यवसाय करणे शक्य नाही. मोजक्या खाद्यपदार्थांसह व्यवसाय सुरू ठेवण्याचे प्रयत्न हॉटेलचालक करीत आहेत. पुढील दोन ते तीन दिवसांत पुरवठा न झाल्यास सर्वच हॉटेलांना व्यवसाय करणे अशक्य बनेल. एलपीजी सिलिंडरचा पूर्ण पुरवठा बंद न ठेवता काही प्रमाणात कपात करून पुरवठा सुरू करावा, अशी हॉटेलचालकांची मागणी आहे. पुण्याचा विचार करता हॉटेल क्षेत्रावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे १५ ते १८ लाख रोजगार अवलंबून आहेत. त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न आता निर्माण झाला आहे. याचबरोबर हॉटेल व्यवसायावर अवलंबून असलेले भाजीवाले, चिकन, मटण आणि अंडी विक्रेत्यासह इतर व्यावसायिकांची परिसंस्था धोक्यात आली आहे, असे जहागीरदार यांनी स्पष्ट केले. शहरात महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडकडून (एमएनजीएल) पाइप्ड नॅचरल गॅसचा (पीएनजी) पुरवठा केला जातो. सध्या पीएनजी पुरवठा सुरळीत सुरू आहे. त्यामुळे पीएनजी जोडणी असलेली हॉटेल व्यवस्थितपणे सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर पीएनजी जोडणी नसलेल्या हॉटेलचालकांची एमएनजीएलने शुक्रवारी बैठक घेतली. या बैठकीत हॉटेलचालकांना कमीत कमी वेळेत पीएनजी जोडणी देण्यासाठी एमएनजीएलने पुढाकार घेतला. याचबरोबर जोडणीसाठी भराव्या लागणाऱ्या ठेव रकमेत सवलतही देण्याची तयारी दर्शविली. या बैठकीला शहरातील १५० ते २०० हॉटेलचालक उपस्थित होते. या हॉटेलचालकांना तातडीने जोडणी देण्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### विशाल छुगेरा प्रॉपर्टीजतर्फे चॅनेल पार्टनर्स संमेलनाचे आयोजन

**पुणे (आरंभ पर्व) : एन. ए. प्लॉटिंग क्षेत्रातील अग्रणी विशाल छुगेरा (व्ही. सी. प्रॉपर्टीज) पुढाकाराने विमाननगर येथील हॉटेल ग्रँड हयात येथे आयोजित चॅनेल पार्टनर्स संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुणे आणि परिसरात रिअल इस्टेट क्षेत्रात काम करणाऱ्या जवळपास ६०० व्यावसायिकांनी संमेलनाला हजेरी लावत व्ही. सी. प्रॉपर्टीजच्या बंगलो प्रकल्पांविषयी जाणून घेतले. कंपनीच्या आगामी प्रकल्पांची संकल्पना, त्यामागील नियोजन, तसेच ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सुविधा आणि गुंतवणुकीच्या संधी याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. व्ही. सी. प्रॉपर्टीजचे चेअरमन विशाल छुगेरा, संचालक अमन छुगेरा व क्रिश छुगेरा, मार्गदर्शक व सल्लागार दर्शन चावला आणि किशन मिलानी उपस्थित होते.**

### आंबेडकर जयंतीदरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याची मागणी

**पुणे (आरंभ पर्व) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या काळात समाजातील कार्यकर्त्यांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी अधिकृत पत्र पाठवून प्रशासनाला योग्य निर्देश देण्याची विनंती केली आहे. वाडेकर यांनी आपल्या पत्रात म्हंटले आहे की, पुणे शहरात दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर समाजातील विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मात्र काही वेळा उत्सवाच्या गर्दीमुळे किंवा परिस्थितीमुळे किरकोळ नियमभंग होतो आणि त्यावरून काही कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले जातात. मागील काही वर्षांत आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांवर अशा प्रकारचे गुन्हे दाखल झाले आहेत. समाजाच्या वतीने हे गुन्हे मागे घेण्याची मागणी सातत्याने करण्यात येत आहे. विशेष म्हणजे २०१६ ते २०२४ या कालावधीत दाखल झालेल्या गुन्ह्यांबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. इतर सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये जसे की गणेशोत्सव किंवा इतर सार्वजनिक उत्सवांमध्ये दाखल झालेले गुन्हे शासनाकडून मागे घेण्यात आलेले आहेत. त्याच धर्तीवर आंबेडकर जयंतीदरम्यान दाखल झालेले गुन्हेही तातडीने मागे घ्यावेत, अशी मागणी उपमहापौरांनी पत्राद्वारे केली आहे. याबाबत राज्य शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन प्रशासनाला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंतीही त्यांनी केली आहे.**




### मनसेच्या सदस्य नोंदणीचा 'धडाका'

**जळगाव (आरंभ पर्व) : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार, जळगाव शहरात मनसेच्या वतीने 'सदस्य नोंदणी अभियाना'चा गुरुवारी अत्यंत दिमाखात प्रारंभ करण्यात आला. पक्षाचे ज्येष्ठ नेते ॲड. जयप्रकाश बाविस्कर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यात कार्यकर्त्यांचा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला. शहरातील महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या काव्यरत्नावली चौकात सायंकाळी ५ वाजता या अभियानाला सुरुवात झाली. यावेळी मनसेच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. 'जय महाराष्ट्र' आणि राज ठाकरे यांच्या समर्थनार्थ दिलेल्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. ॲड. बाविस्कर यांनी स्वतः उपस्थित राहून नोंदणी प्रक्रियेची पाहणी केली आणि उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत जोमाने कामाला लागण्याचे आवाहन केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. नोंदणीसाठी अनेक युवकांनी आणि महिलांनी आपला पासपोर्ट फोटोसह उपस्थित राहून मनसेचे सदस्यत्व स्वीकारले. यावेळी ॲड. बाविस्कर म्हणाले की, "राजसाहेबांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि जळगाव शहराच्या ज्वलंत प्रश्नांवर सक्षमपणे लढण्यासाठी ही सदस्य नोंदणी मैलाचा दगड ठरेल." या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनसेच्या शहर कार्यकारिणीने विशेष परिश्रम घेतले.**

# वाघोलीत १८ ते २२ मार्चदरम्यान ६८वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा

## विजेत्याला मानाची गदा आणि फॉर्च्युनर गाडी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्रातील पारंपरिक आणि अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे ६८ वे अधिवेशन यंदा पुणे जिल्ह्यातील वाघोली येथे रंगणार आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने आणि पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामकृष्ण सातव पाटील यांच्या वतीने ही स्पर्धा १८ ते २२ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच इतक्या भव्य आणि दिव्य स्वरूपात आयोजन करण्यात येत आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धेची सुरुवात स्व. कुस्ती महर्षी मामासाहेब मोहोळ यांनी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या माध्यमातून केली. या स्पर्धेच्या माध्यमातून राज्यातील कुस्तीपटूंनी मोठी कामगिरी करत राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावे हा त्यामागील मुख्य उद्देश होता. गेली ६७ वर्षे सातत्याने या स्पर्धेचे आयोजन होत असून यंदा ६८वे अधिवेशन पार पडत आहे.

रामकृष्ण सातव पाटील हे पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान संचालक असून त्यांनी पुणे जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य, वाघोली गावचे माजी उपसरपंच तसेच माजी पोलीस पाटील अशी विविध पदे भूषवली आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली यंदाची महाराष्ट्र केसरी स्पर्धा भव्य आणि दिव्य स्वरूपात आयोजित करण्यात येत आहे. ही स्पर्धा स्व. अजितदादा पवार क्रीडानगरी, बाजार मैदान, वाघोली (पुणे) येथे पार पडणार आहे. क्रीडा क्षेत्रातील स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या योगदानाचा सन्मान म्हणून क्रीडानगरीला "स्व. अजितदादा पवार क्रीडानगरी" असे नाव देण्यात आले आहे. स्पर्धेचे उद्घाटन १८ मार्च रोजी राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. श्रीमती सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. तर २२ मार्च रोजी समारोप व बक्षीस वितरण सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपस्थित राहणार आहेत. कुस्ती महर्षी मामासाहेब मोहोळ यांच्या स्मरणार्थ दिली जाणारी महाराष्ट्र केसरीची मानाची गदा केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मा. पै. मुरलीधर अण्णा मोहोळ यांच्या वतीने देण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी मातीचे दोन आणि मॅटचे दोन असे एकूण चार आखाडे उभारण्यात येणार आहेत. मातीच्या आखाड्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा कुस्ती संघांकडून माती आणून विशेष आखाडा तयार करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाशी संलग्न असलेल्या राज्यातील ४२ जिल्हा कुस्ती संघांमधून सुमारे १५०० मल्ल या स्पर्धेत सहभागी होत आहेत. राज्यातील अनेक नामांकित तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळलेले कुस्तीपटू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. प्रेक्षकांसाठी ३५ ते ४० हजार क्षमतेचे भव्य स्टेडियम उभारण्यात येत आहे. तसेच वाहनांसाठी मोठ्या प्रमाणावर पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

सातव हायस्कूल, मोझे कॉलेज पार्किंग, बाजारतळ (VIP), केसनंद फाटा बसस्टॉप समोर, आव्हाळवाडी रोड - मुकेश सातव प्लॉट, तुकाराम सातव प्लॉट, जोशी पार्किंग आणि अनिल सातव प्लॉट येथे पार्किंगची सोय उपलब्ध असेल. स्पर्धेदरम्यान पंच, मल्ल व प्रशिक्षकांसाठी सुरक्षा, आरोग्य, निवास व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. सहभागी मल्लांना ट्रॅक सूट, जिम बॅग आणि खुराक देण्यात येणार आहे. तसेच कुस्तीप्रेमींना स्पर्धा पाहता यावी यासाठी लाईव्ह टेलिकास्टची व्यवस्था करण्यात आली आहे. क्रीडानगरीच्या परिसरात पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहाची सुविधा देखील उपलब्ध असेल.

तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धेदरम्यान विशेष उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

### बोधचिन्ह अनावरण

**या स्पर्धेच्या लोगोचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच महाराष्ट्र केसरी विजेत्याला दिल्या जाणाऱ्या मानाच्या गदेचे पूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्रातील सर्व कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मानाच्या आणि ऐतिहासिक स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांनी केले आहे.**

## जागतिक प्रोटीन दिनानिमित्त IB Group चे देशव्यापी अभियान




- **२,५०० हून अधिक तहसीलांमध्ये "हर घर हर दिन चिकन प्रोटीन"चा नारा**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक प्रोटीन दिनानिमित्त देशातील अग्रगण्य ॲग्री-फूड कंपनी IB Group ने "हर घर हर दिन चिकन प्रोटीन" या शीर्षकाखाली व्यापक राष्ट्रव्यापी मोहीम राबवली. ही मोहीम काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत 20 राज्यांतील 2,500 हून अधिक तहसीलांमध्ये एकाच वेळी पार पडली. भारतातील महिला आणि मुलांमध्ये आढळणाऱ्या 73 टक्के प्रोटीन कमतरतेबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. आकडेवारीनुसार देशातील दर 10 पैकी 7 महिला आणि मुले पुरेसे प्रोटीन घेत नाहीत, ही एक गंभीर पोषण समस्या बनली आहे. या व्यापक जनसंपर्क मोहिमेचा मुख्य भर ग्रामीण आणि अर्ध-शहरी भागातील समुदायांना त्यांच्या दैनंदिन आहारात पुरेशा प्रमाणात प्रोटीनचा समावेश करण्याचे महत्त्व पटवून देण्यावर होता. IB Group च्या टीम्सनी गावागावांत व तहसील स्तरावर भेटी देत सरपंच, ग्रामप्रमुख आणि स्थानिक मान्यवरांच्या सहकार्याने जनजागृती बैठका आयोजित केल्या. या सत्रांदरम्यान कुटुंबांना सांगण्यात आले की मुलांच्या योग्य शारीरिक वाढीसाठी आणि मेंदूच्या विकासासाठी दररोज 25 ते 50 ग्रॅम प्रोटीन आवश्यक आहे. महिलांना रोगप्रतिकारक शक्ती आणि एकूण आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी दररोज 50 ते 60 ग्रॅम प्रोटीनची गरज असते.

## १ कोटींच्या फिल्टर बेड रिग्रेडेशन कामाचे लोकार्पण





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या मुख्य खात्यांतर्गत कोंढवे धावडे जलशुद्धीकरण केंद्र येथे सुमारे १ कोटी रुपयांच्या निधीतून करण्यात आलेल्या फिल्टर बेड वाळू रिग्रेडेशन कामाचे लोकार्पण लोकप्रिय नगरसेवक सुभाष नाणेकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

या कामामध्ये जलशुद्धीकरण प्रक्रियेतील फिल्ट्रेशन कार्यक्षमता वाढविणे, फिल्टर बेडमधील वाळूची पुनर्रचना (Re-gradation) करणे, तसेच पाण्यातील सूक्ष्म कण, गाळ व अशुद्धी अधिक प्रभावीपणे दूर करण्यासाठी तांत्रिक सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यामुळे या केंद्रातून पुरवठा होणाऱ्या पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता अधिक सुधारण्यास मदत होणार आहे. यावेळी ठेकेदार राजेंद्र वाळुंज, विनोद माने, डेप्युटी इंजिनिअर सूर्यभान जाधव साहेब व श्रीपाद जाधव (पुणे मनपा) यांच्या हस्ते नगरसेवक सुभाष नाणेकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना सुभाष नाणेकर म्हणाले, "पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार पिण्याचे पाणी देणे ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे. कोंढवे धावडे जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर बेड वाळू रिग्रेडेशनसारखी तांत्रिक कामे पूर्ण झाल्यामुळे जलशुद्धीकरण प्रक्रियेची कार्यक्षमता वाढेल आणि परिसरातील नागरिकांना अधिक स्वच्छ व गुणवत्तापूर्ण पाणी उपलब्ध होईल. भविष्यातही पाणीपुरवठा व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सुविधा अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न राहील." कार्यक्रमाला भाजपा शिवणे-धायरी मंडल अध्यक्ष विजय मते, चेअरमन भगवान मोरे, अनुसूचित जाती-जमाती शहर उपाध्यक्ष भाजपा प्रकाश शेठ साळवी, नेते अनिलजी मते, कैलास आप्पा नाणेकर, भाजप नेते सुभाष शिंदे सरकार, युवा मोर्चा अध्यक्ष निखिल धावडे, सरपंच विजय चांदणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच सचिन कांबळे, संतोष पवार, राहुल भाऊ मोरे, पराग कांबळे, अजय बाबर, विलास धावडे, आप्पा पायगुडे, करण कांबळे, संदीप सरोदे, दत्ता नाणेकर, शिवाजी भोसले, रुपेश थोरात तसेच पुणे महानगरपालिका जलशुद्धीकरण केंद्राचे सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कामामुळे जलशुद्धीकरण प्रक्रियेची कार्यक्षमता वाढून परिसरातील नागरिकांना अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

## महिलांना उमेद महिला मॉलद्वारे व्यवसायाची नवी दिशा

*महिला उद्योजकतेसाठी शासनाच्या निर्णयाला कुसुमवत्सल्य फाउंडेशनचा हातभार*




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्य शासनाने महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांच्या पार्श्वभूमीवर कुसुमवत्सल्य फाउंडेशन ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने महिलांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये महिलांना स्वावलंबी होण्यासाठी उपलब्ध असलेल्या संधी, शासकीय योजना आणि व्यवसायाच्या नव्या वाटांबाबत माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात महिलांच्या आरोग्याविषयी जनजागृती करण्यात आली तसेच महिलांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करून आर्थिकदृष्ट्या सक्षम कसे व्हावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः उमेद महिला मॉल या संकल्पनेद्वारे महिलांना व्यवसायाची संधी कशी मिळू शकते, त्यासाठी बचत गट आणि शासकीय योजनांचा कसा लाभ घेता येतो याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी महिला सक्षमीकरण प्रवक्ता सौ. पंचशीला कुंभारकर यांनी उपस्थित महिलांना बचत गट, शासनाच्या विविध योजना आणि स्वयंपूर्ण व्यवसायाच्या संधींबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास मान्यवर पाहुणे म्हणून लक्ष्मीताई वाघमारे, निलेश खंडाळे, रमाताई आठवले व नीता रसाळकर यांची उपस्थिती लाभली. या उपक्रमाचे आयोजन कुसुमवत्सल्य फाउंडेशन ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने करण्यात आले.

संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा वैशाली पाटील या महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असून कार्यक्रमाला परिसरातील अनेक महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.


## नवले पुलावर अपघात; ट्रकचा ब्रेक फेल होऊन दुचाकीस्वार ठार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील नवले पूल परिसरात पुन्हा एकदा भीषण अपघात घडला असून ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या अपघातामुळे परिसरात काही काळ तणाव आणि वाहतूक कोंडी निर्माण झाली. मिळालेल्या माहितीनुसार, नवले पुलाखाली उताराच्या भागात येत असताना एका ट्रकचा अचानक ब्रेक फेल झाला. नियंत्रण सुटलेल्या ट्रकने समोर असलेल्या कारला आणि दुचाकीला मागून जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत दुचाकी ट्रक आणि कारच्या मध्ये अडकली. अपघात इतका गंभीर होता की दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना मदत करण्यात आली तसेच वाहतूक सुरळीत करण्याचे काम करण्यात आले. काही काळ या मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. नवले पुलाखाली वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या परिसरातील धोकादायक उतार, वेगाने धावणारी जड वाहने आणि ब्रेक फेल होण्याच्या घटना यामुळे अनेकदा गंभीर अपघात घडले आहेत.

## स्वराज्यकालीन 'उभे' घराण्याचा इतिहास उलगडला

- **रायगड राज्याभिषेकावेळी उपस्थित असलेल्या सरदारांची नोंदीमध्ये उभे घराण्याची नोंद**
- **अँड. मारुतीआबा गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री विशाल दत्तात्रय उभे यांचे संशोधन**



८८
मौजे कोटूर
मोकदम चांदजी गुजर
नंदजी नीमण चौगुला
१ सूर्याजी हुसका
१ xxxx
१ बावाजी मोसरा
२ गिरमाजी व सखाजी
१ हिरोजी हुसका
मोकदम
४
अजहती दिग्ा देशमुख
कोसाडे
मोकदम
१ येसाजी मारणा
१ बावाजी मोसरा
नागोजी चौगुला मोकदम
बातोडो कान्होजी जोरे
२ गिरमाजी व सखाजी
१ बालोजीमारणा
१ सोनजी मारणा
चौगुला
४
१ काऊजी मारणा
कोवरडे
मोकदम
नागोजी व कमाजी धुले चौगुला
मोकदम कर्नोजी नाईक व मताजी नाईक उभे
तान्हाजी चौगुला
राईत रायाजी गव्हाणा चौगुला
१ येसाजी मारणा
१ सावजी मारणा
१ मल्हारजी मारणा
३
मौजे भोवली
मानाजी भगत चौगुला
होत साळवी कुंभार मेहतरी
तामार
जानोजी तेली मेहतर
मोकदम सूर्याजी मार्णा अजहती
खरवडे भिमाजी पाणसरा
मोख्तसर कुणी
१ कृष्णाजी पोटकर

> **"स्वराज्याच्या इतिहासात अनेक कुटुंबांचे योगदान अजूनही प्रकाशात आलेले नाही. उभे घराण्याच्या इतिहासाबाबत सापडलेली ही नोंद भविष्यातील संशोधनासाठी महत्त्वाची ठरेल."**
> **– अँड. मारुती आबा गोळे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हिंदवी स्वराज्याचे सरनोबत पिलाजीराव गोळे यांचे चौदावे वंशज आणि आग्रावीर अँड. मारुती आबा गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री विशाल दत्तात्रय उभे यांनी उभे घराण्याचा इतिहास संशोधनातून उलगडण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न केला आहे. या संशोधनातून स्वराज्यकालीन उभे घराण्याच्या योगदानाबाबत महत्त्वपूर्ण नोंदी समोर आल्या आहेत.

"मजहर – महाराष्ट्राच्या इतिहासाचे दस्तऐवज (इ.स. १५०० ते १८००)" या ऐतिहासिक दस्तऐवजांच्या ग्रंथातील पान क्रमांक ८८ वर 'कोवरडे' (सध्याचे नाव कोळावडे) या गावाचा उल्लेख आढळतो. या नोंदीमध्ये स्वराज्यकालीन सरदार म्हणून 'नाईक कर्नोजी उभे' आणि 'मताजी उभे' या दोन सरदारांची नावे नमूद असल्याचे संशोधनात स्पष्ट झाले आहे. इतिहासातील उपलब्ध माहितीनुसार हे दोन्ही सरदार छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी रायगडावर उपस्थित होते, अशी महत्त्वपूर्ण नोंदही समोर आली आहे. या नोंदीमुळे उभे घराण्याचा स्वराज्याशी असलेला ऐतिहासिक संबंध अधोरेखित झाला आहे. या संशोधनामुळे उभे घराण्याचा इतिहास केवळ इतिहासापुरता मर्यादित न राहता स्वराज्यासाठी या घराण्याने दिलेल्या योगदानाची माहिती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. भविष्यात स्वराज्याच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांसाठी ही नोंद महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत इतिहास अभ्यासकांनी व्यक्त केले आहे.

## विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे आणि आजूबाजूच्या परिसरातील वाचनप्रेमींसाठी एक आनंदाची बातमी आहे. उत्कृष्ट बुक सर्विसतर्फे विविध प्रकारच्या पुस्तकांचे प्रदर्शन सुरु करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये जुनी आणि नवीन अशा दोन्ही प्रकारची पुस्तके उपलब्ध असून मराठी, इंग्रजी,धार्मिक,इतिहास आणि विविध विषयांवरील पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहेत.अशी माहिती प्रकाशनाचे प्रमुख सुधाकर जोशी यांनी सांगितली. डेक्कन जिमखान्यावरील दुकानामध्ये प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून ते सर्वांसाठी उपलब्ध असणार आहे. प्रदर्शनामध्ये पुस्तकांची आकर्षक पद्धतीने विषयावर वर्गीकरण करून मांडणी करण्यात आली आहे.त्यामुळे वाचकांना आवडीची पुस्तके सहजपणे शोधता येत आहेत. ज्ञानवृद्धी, अभ्यास आणि वाचनाची आवड जपणाऱ्यांसाठी प्रदर्शन एक उत्तम संधी आहे.

# जाती-धर्माच्या राजकारणात अडकलेला समाज



**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**(दै. आरंभ पर्व)**

आज देशातील सामान्य माणसासमोर अनेक गंभीर प्रश्न उभे आहेत. महागाई दिवसेंदिवस वाढत आहे, गॅस सिलेंडरचे दर वाढत आहेत, पेट्रोल-डिझेल महाग होत आहे, शिक्षण आणि आरोग्य खर्चिक होत चालले आहे. सामान्य माणूस रोजच्या जगण्यासाठी झगडत आहे. पण दुर्दैवाने या खऱ्या प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी समाजात जात आणि धर्माच्या नावावर भिंती उभ्या केल्या जात आहेत. सिलेंडर महाग झाला, डाळ-तांदूळ महाग झाले, भाज्या महाग झाल्या, तर जात किंवा धर्म आपल्याला कमी पैशात हे सर्व देणार आहे का? महागाईमुळे जेव्हा घराचा खर्च सांभाळणे कठीण होते, तेव्हा हिंदू, मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन असा कोणताही भेद राहत नाही. त्रास सर्वांनाच होतो. पोटाची भूक आणि जगण्याची गरज या कोणत्याही धर्माच्या चौकटीत बसत नाहीत. अलीकडे काही नेते किंवा तथाकथित समाजनेते असे विधान करतात की "फक्त हिंदूकडूनच खरेदी करा." हा विचार ऐकायला जरी काही लोकांना भावनिक वाटत असला, तरी वास्तवात तो किती अव्यवहार्य आहे हे आपण समजून घ्यायला हवे.

आपण रोज ज्या बाजारपेठेत जातो, ती कोणाच्या एका धर्माची नाही. भाजी विकणारा कोण आहे, किराणा दुकानाचा मालक कोण आहे, औषध देणारा फार्मासिस्ट कोण आहे, डॉक्टर कोण आहे, ऑटो-रिक्षा चालक कोण आहे. हे सगळे वेगवेगळ्या धर्मांचे असतात. समाज हा परस्परांवर अवलंबून असलेल्या लोकांनी तयार होतो. म्हणूनच अर्थव्यवस्था चालते.

जर खरंच कोणाला समाजाची चिंता असेल, तर त्यांनी रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, उद्योग उभे करावेत, तरुणांना नोकऱ्या उपलब्ध करून द्याव्यात. पण "फलाण्याकडून खरेदी करू नका" असे सांगणे हा खरा उपाय नाही. तो फक्त समाजात अविश्वास आणि द्वेष निर्माण करणारा मार्ग आहे. खरे नेतृत्व ते असते जे समाजाला जोडते. पण आज अनेकदा राजकारणासाठी लोकांच्या भावना भडकवल्या जातात. जात-धर्माच्या नावाने लोकांना विभागले की खरे प्रश्न मागे पडतात. महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, शिक्षण-आरोग्य व्यवस्था. या सगळ्या गोष्टींची चर्चा कमी होते. समाजानेही आता जागे होण्याची गरज आहे. आपण कोणाच्या भडकाऊ भाषणांमध्ये अडकून राहणार का, की वास्तवातील प्रश्न विचारणार? लोकशाहीमध्ये नागरिकांनी प्रश्न विचारले तरच व्यवस्था सुधारते.

आज गरज आहे ती माणुसकी जपण्याची. कारण बाजारपेठ असो, रुग्णालय असो, शाळा असो किंवा कामाचे ठिकाण. प्रत्येक ठिकाणी माणूस हा माणूस म्हणूनच महत्त्वाचा असतो. त्याचा धर्म किंवा जात नव्हे.

आपण लक्षात ठेवायला हवे की देशाची ताकद विविधतेत आहे. वेगवेगळ्या धर्माचे, संस्कृतीचे, भाषांचे लोक एकत्र राहून समाज घडवतात. हीच खरी भारताची ओळख आहे.

म्हणूनच आता स्वतःला एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. आपण जात-धर्माच्या नावाने भांडत राहणार आहोत का, की महागाई, रोजगार आणि विकास यांसारख्या खऱ्या प्रश्नांवर आवाज उठवणार आहोत?

कारण शेवटी सत्य एकच आहे. धर्म पोट भरत नाही, पण एकत्र राहणारा समाज नक्कीच देश घडवू शकतो.






दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

रविवार, दि. १५ मार्च २०२६









# गॅस सिलेंडरसाठी धायरीत लागल्या मोठ्या रांगा

## शासनाने नियोजन करायला पाहिजे होते म्हणत नागरिकांनी व्यक्त केली खंत



**धायरी (पुणे) (दै. आरंभ पर्व)**

इराण व अमेरिका यांच्यातील वाढता तणाव आणि युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता सामान्य नागरिकांवरही होत असल्याचे चित्र दिसत आहे. गॅस सिलेंडरच्या उशिरा होणाऱ्या पुरवठ्यामुळे धायरी व परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. धायरी परिसरातील अनेक नागरिकांनी सांगितले की, गॅस बुक केल्यानंतर सिलेंडर मिळण्यासाठी तब्बल दहा-दहा दिवसांची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे दैनंदिन स्वयंपाकाचा प्रश्न गंभीर बनला असून, "घरात स्वयंपाक करायचा कसा आणि खायचे काय?" असा प्रश्न नागरिकांसमोर उभा राहिला आहे. सकाळी सहा वाजल्यापासूनच गॅस सिलेंडरसाठी एजन्सीसमोर नागरिकांच्या रांगा लागत असल्याचे चित्र दिसत आहे. एवढ्या मोठ्या देशातही जीवनावश्यक वस्तू वेळेवर मिळत नसल्याने नागरिकांनी केंद्र सरकारच्या नियोजनावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. युद्धजन्य परिस्थिती लक्षात घेऊन आधीच योग्य नियोजन व उपाययोजना केल्या असत्या, तर नागरिकांना असा त्रास सहन करावा लागला नसता, असे मतही काही नागरिकांनी व्यक्त केले.

नागरिकांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया देताना सांगितले की, "दहा-दहा दिवस गॅस मिळत नाही, घरात लहान मुले व वृद्ध आहेत. अशा परिस्थितीत स्वयंपाक कसा करायचा?" तर काहींनी, "सकाळपासून रांगेत उभे राहावे लागते. आम्ही नेमके कोणत्या व्यवस्थेत राहतो आहोत?" असा संतप्त सवाल उपस्थित केला. दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यात कुठेही गॅस टंचाई नसल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र प्रत्यक्षात धायरी व परिसरातील नागरिकांना उशिरा गॅस मिळत असल्याने असंतोष वाढताना दिसत आहे. याबाबत विविध गॅस एजन्सींशी संपर्क साधला असता, उपलब्ध पुरवठ्यानुसार गॅस वितरण सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शासनाच्या धोरणानुसारच गॅस सिलेंडर उपलब्ध होत असून, पुरवठा मिळताच ग्राहकांना वितरित केला जात असल्याची माहिती एजन्सीकडून देण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### घरगुती गॅसची दरवाढ रद्द करा; गॅस पुरवठा सुरळीत करा

- पुणे शहर महिला काँग्रेसचे अनोखे आंदोलन

पुणे (आरंभ पर्व) : घरगुती गॅस सिलेंडरची दरवाढ रद्द करून, गॅस पुरवठा सुरळीत करा, अशा मागणीसाठी पुणे शहर महिला काँग्रेसच्या वतीने बालगंधर्व चौकात रस्त्यावर चूल पेटवून आज (शनिवारी) संध्याकाळी आंदोलन करण्यात आले. पुणे शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा स्वातीताई शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. चौकात पारंपरिक पद्धतीने शेणाने सारवून शेणाच्या गोवऱ्यांचा ढीग रचून चूल मांडण्यात आली आणि त्यावर महिला कार्यकर्त्यांनी स्वयंपाक केला. महागाईमुळे गरीब, मध्यमवर्गीय, कष्टकरी महिला वर्ग आधीच पिचला आहे. त्यातच अचानकपणे घरगुती गॅस सिलेंडर चे दर ६० रुपयांनी वाढविण्यात आले. सरकारचा हा निर्णय अनाकलनीय आहे. गॅस सिलेंडर अभावी हॉटेल्स बंद पडत आहेत. घरगुती गॅस सिलेंडर महाग झाला असून तो वेळेवर मिळणेही अवघड झाले आहे. सरकारच्या नियोजनशून्य कारभारामुळे हे घडत आहे., त्याचा आम्ही निषेध करत आहोत, असे स्वातीताई शिंदे यांनी आंदोलकांसमोर बोलताना सांगितले. गॅस दरवाढीच्या विरोधात महिला कार्यकर्त्यांनी हातात फलक घेऊन आंदोलन केले.'महागाईला आळा घाला, गॅस सिलेंडर स्वस्त करा','जनतेची लूट थांबवा, गॅस दर कमी करा', गॅसच्या किंमती कमी करा, नाहीतर खुर्ची खाली करा' अशा घोषणा फलकांवर लिहीलेल्या होत्या. आंदोलनात स्वातीताई शिंदे यांच्या समवेत नगरसेविका अश्विनी लांडगे, अनिता मकवाना, रेखा जैन, ॲड.अंजली देसाई, ॲड.राजश्री दामले-चव्हाण, कल्पना शिंदे, ज्योती अडागळे, गितांजली प्रकाश, दिपाली पवार, मनोरमा चौधरी, वर्षा सपकाळ आदी पदाधिकारी आणि कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




### चंदूकाका सराफ कर्मचाऱ्यांसाठी सम्मेद शिखरजी यात्रा यात्रा

पुणे (आरंभ पर्व) : चंदूकाका सराफ संस्थेतील कर्मचाऱ्यांसाठी सौ. संगीता अतुल शहा यांच्या तर्फे सम्मेद शिखरजी यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेची सुरुवात दिनांक १३ तारखेला पुणे येथील हेड ऑफिसमधून करण्यात आली. या यात्रेदरम्यान सर्व यात्रेकरूंना पंढरपूर, पावापूर आणि चंपापूर, कुंडलपूर या पवित्र तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. यात्रेची संपूर्ण व्यवस्था संस्थेच्या वतीने करण्यात आली असून, सर्व यात्रेकरूंना सुरक्षितपणे दर्शन घडवून पुन्हा पुण्यात परत आणण्याची सोय करण्यात आली आहे. याबाबत बोलताना सौ. संगीता अतुल शहा म्हणाल्या, "कर्मचारी हेच संस्थेचे खरे बळ आहेत. त्यांच्या आध्यात्मिक समाधानासाठी आणि एकात्मता वाढवण्यासाठी ही यात्रा आयोजित करण्यात आली आहे. सर्वांनी आनंदाने आणि श्रद्धेने या यात्रेचा लाभ घ्यावा." या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, संस्थेच्या या सामाजिक व आध्यात्मिक उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.



### बार्शी पंचायत समिती सभापती व उपसभापतींचा ग्रामस्थांकडून सत्कार

बार्शी (आरंभ पर्व) : माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या नेतृत्वाखाली बार्शी पंचायत समितीच्या सभापतीपदी सौ. मीनाक्षीताई रोंगे व उपसभापतीपदी श्री. संतोषदादा निंबाळकर यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करण्यात आले. निवडीनंतर सारोळे ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी, ज्येष्ठ नेते विलासदादा गाटे, सोलापूर जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष रणवीर राऊत , मा.सरपंच बाळराजे गाटे,वैराग नगरपंचायत चे नगरसेवक शाहूराजे निंबाळकर,पंचायत समिती सदस्य सौ . सविता विश्वनाथ साबळे, विश्वनाथ साबळे सर, सारोळे विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक अरुणबाबा पाटील , प्रतीक साबळे, राजाभाऊ जाधव यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी नूतन सभापती व उपसभापती यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## वर्ल्ड मिशन सोसायटी चर्च ऑफ गॉड असोसिएशन तर्फे रक्तदान शिबिर संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वर्ल्ड मिशन सोसायटी चर्च ऑफ गॉड असोसिएशनच्या वर्धापन दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. श्रीमती काशीबाई नवले रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात ६५ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. काशीबाई नवले मेडिकल कॉलेज गणपती हॉल येथे हे शिबिर पार पडले. यावेळी श्रीमती काशीबाई नवले रक्तपेढीचे प्रभारी डॉ. आदित्य निसर्गी, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. राजीव खटावकर, डॉ. संजय पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी दत्तात्रय जाधव यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमादरम्यान डॉ. राजीव खटावकर यांनी रक्तदानाचे महत्त्व विशद करताना रक्तदान ही एक सामाजिक जबाबदारी असून प्रत्येकाने नियमित रक्तदान करून गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचा संदेश दिला.या वेळी वर्ल्ड मिशन सोसायटी चर्च ऑफ गॉड असोसिएशनचे सदस्य तसेच इतर रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभू येशू ख्रिस्त यांच्या शिकवणीवर आधारित समाजोपयोगी कार्य पुढेही सुरू ठेवले जाईल, असे मत आयोजकांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डायरेक्टर निक्सन जॉन, रसल, बाबासाहेब कांबळे, मंजुनाथ यादव यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जुनेगाव मुख्य रस्त्यावर स्पीड ब्रेकर बसवण्याची मागणी

*नगरसेवक प्रशांत टोंगे यांचे प्रशासनाला पत्र; शालेय विद्यार्थी व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न*

**मुक्ताईनगर-सागर नानोटे (दै. आरंभ पर्व)**

जुनेगाव परिसरातील मुख्य रस्त्यावर वाढती रहदारी आणि तरुणांकडून होणारी अतिवेगवान वाहन चालवणूक यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. नागरिकांच्या आणि शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी या मार्गावर तात्काळ 'स्पीड ब्रेकर' (गतिरोधक) बसवण्यात यावेत, अशी मागणी प्रभाग क्र. १ चे नगरसेवक श्री. प्रशांत अशोक टोंगे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



जुनेगाव परिसरात साधारण ८ ते १० हजार नागरिकांची वस्ती आहे. या मुख्य रस्त्यावर जे. ई. स्कूल आणि जिल्हा परिषद मराठी शाळा अशा महत्त्वाच्या शैक्षणिक संस्था आहेत. तसेच याच परिसरात आठवडे बाजार भरत असल्याने येथे दिवसभर पुरुष, महिला आणि विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. निवेदनात नमूद केल्यानुसार, गेल्या काही दिवसांपासून काही तरुण या गजबजलेल्या रस्त्यावरून अत्यंत वेगाने आणि बेदरकारपणे दुचाकी चालवतात. यामुळे पादचाऱ्यांना चालणे कठीण झाले असून, लहान मुले आणि वृद्धांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने येथे उपाययोजना करणे गरजेचे आहे.

आता प्रशासनाकडून या मागणीवर किती लवकर कार्यवाही केली जाते, याकडे जुनेगाववासीयांचे लक्ष लागले आहे.

> "नागरिकांची सुरक्षितता ही आमची प्राथमिकता आहे. शाळा आणि बाजारामुळे या रस्त्यावर नेहमीच गर्दी असते. अतिवेगामुळे कोणाचाही जीव जाऊ नये, यासाठी गतिरोधक बसवणे अनिवार्य आहे. प्रशासनाने याची दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करावी."
>
> - प्रशांत अशोक टोंगे (नगरसेवक, प्रभाग क्र. १)

## मातोश्रीवर 'कार्टूनिस्ट्स कंबाईन'च्या लोगोचे अनावरण

### व्यंगचित्रकारांसाठी कायमस्वरूपी जागेचे आश्वासन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मातोश्री येथे 'कार्टूनिस्ट्स कंबाईन' या नव्याने नोंदणीकृत व्यंगचित्रकारांच्या संस्थेच्या लोगोचे आणि नोंदणी प्रमाणपत्राचे अनावरण उद्धव ठाकरे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी ज्येष्ठ नेते व माजी मंत्री सुभाष देसाई उपस्थित होते. महाराष्ट्रातील व्यंगचित्रकारांच्या संघटनात्मक वाटचालीतील हा एक महत्त्वाचा आणि ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे.



बाळासाहेब ठाकरे यांनी व्यंगचित्रकारांसाठी अधिकृत संस्था असावी आणि तिचे नाव 'कार्टूनिस्ट्स कंबाईन' असावे, अशी संकल्पना आपल्या काळात मांडली होती. त्याच विचाराला पुढे नेत महाराष्ट्रातील सुमारे ५० व्यंगचित्रकारांनी एकत्र येत देणगी स्वरूपात आर्थिक सहकार्य करून संस्थेची अधिकृत नोंदणी पूर्ण केली. संस्थेची सुरुवात बाळासाहेबांच्या स्मृतींशी जोडलेल्या मातोश्रीवरून व्हावी, असा निर्णय घेण्यात आला.

संस्थेचे प्रतिनिधी धनराज गरड आणि गौरव सर्जेराव यांच्या नेतृत्वाखाली उद्धव ठाकरे यांची भेट घेण्यात आली. या वेळी संस्थेमार्फत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती, छायाचित्रे आणि भविष्यातील योजना सादर करण्यातऊ आल्या. उद्धव ठाकरे यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत व्यंगचित्रकलेच्या सामाजिक प्रभावावर मार्गदर्शन केले.

या भेटीत दादर येथील बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक येथे नवोदित व्यंगचित्रकारांसाठी कार्यशाळा दालन, पुण्यात व्यंगचित्रकार भवन, तसेच ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांना पद्म पुरस्कारासाठी प्रयत्न अशा मागण्या मांडण्यात आल्या.

उद्धव ठाकरे यांनी स्मारकात संस्थेला कार्यशाळांसाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.यावेळी अमित पापळ, उदय मोहिते आणि ओमकार बागवे उपस्थित होते.

## भरधाव अर्टिगाची पाच जणांना धडक; २ गंभीर, ३ जखमी

**मुक्ताईनगर(दै. आरंभ पर्व)**

येथील जवळच असलेल्या हरताळा फाट्यावर गुरुवारी सकाळी अर्टिगा कारचा भीषण अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या पाच जणांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात पाचही जण जखमी झाले असून, त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, गुरुवारी सकाळी एक अर्टिगा कार वेगात येत होती. हरताळा फाट्याजवळ आली असता अचानक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. भरधाव कारने रस्त्याच्या कडेला उभे असलेले प्रल्हाद काळू पाटील, सलीम शेख, काशीनाथ साळुंखे, मुरली कोळी आणि ज्ञानेश्वर कोळी यांना जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, धडकेचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली. अपघात घडताच हरताळा येथील सामाजिक कार्यकर्ते प्रदीप काळे यांनी ग्रामस्थांच्या मदतीने तातडीने बचावकार्य सुरू केले. जखमींना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे मुक्ताईनगर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर, जखमींची प्रकृती पाहता त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आहे. जखमींपैकी दोन जणांना गंभीर दुखापत झाली असून तिघे जण किरकोळ जखमी आहेत.

## गॅस दरवाढीविरोधात पुणे जिल्हा काँग्रेसचे आंदोलन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इराण–इस्रायल–अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशात गॅस टंचाई निर्माण झाल्याचा आरोप करत केंद्र सरकारने एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत केलेल्या वाढीच्या निषेधार्थ पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने सिंहगड रस्त्यावरील वीर बाजी पासलकर चौक येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी रस्त्यावर चुली पेटवून गॅस दरवाढीचा निषेध व्यक्त केला. आंदोलनानंतर हवेलीच्या तहसीलदार डॉ. अर्चना निकम यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात गॅस सिलिंडरच्या वाढवलेल्या किमती तात्काळ मागे घ्याव्यात, सिलिंडर बुक करण्याचा कालावधी १५ दिवसांवरून एक महिना करण्यात आल्याने ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून तो पुन्हा कमी करण्यात यावा, तसेच सर्वसामान्य नागरिक, हॉटेल व्यावसायिक आणि लहान उद्योगांना गॅसचा पुरवठा सुरळीत व विनाअडथळा उपलब्ध करून द्यावा, अशा मागण्या करण्यात आल्या.

## रानटी गुरांचा हैदोस : शेतकरी आक्रमक

**घोटावडे (मुळशी) (दै. आरंभ पर्व)**

मुळशी तालुक्यातील घोटावडे आणि परिसरातील शेतकरी गेल्या ५ ते ७ वर्षांपासून रानटी गुरांच्या त्रासामुळे हवालदिल झाले आहेत. अतिवृष्टी किंवा दुष्काळ नाही, तर केवळ या रानटी जनावरांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेती करणे आता अशक्य झाले असल्याची भावना संतप्त शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर आज घोटावडे येथील रोकडोबा मंदिर परिसरात शेतकऱ्यांची तातडीची बैठक पार पडली. घोटावडे परिसरात सुमारे ३० ते ४० रानटी गुरांचा कळप वावरत आहे. ही जनावरे दिवसा वनविभागाच्या हद्दीत आश्रयाला असतात आणि सायंकाळ होताच शेतात शिरून उभ्या पिकांचा फस्त करतात. आपली पिके वाचवण्यासाठी शेतकरी जीव मुठीत धरून रात्रभर शेतात जागता पहारा देत आहेत. २०० पेक्षा जास्त शेतकरी रानटी गुरांमुळे बाधित झालेले आहेत. मात्र,



या कळपातील काही वळू अत्यंत हिंस्त्र झाले असून, त्यांना हाकलण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांच्या अंगावर ते धावून येत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण आहे. या गंभीर समस्येबाबत शेतकऱ्यांनी आतापर्यंत शासन स्तरावर अनेक निवेदने दिली आहेत, परंतु अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. प्रशासनाच्या या उदासीन धोरणामुळे आजच्या बैठकीत शेतकरी कमालीचे आक्रमक दिसले. या बैठकीला परिसरातील सुमारे ५० शेतकरी आणि काही शासकीय पदाधिकारी उपस्थित होते. प्रमुख मागण्यांमध्ये वनविभाग, कृषी विभाग आणि महसूल विभाग यांनी समन्वय साधून या रानटी गुरांचा तातडीने बंदोबस्त करावा, या गुरांना पकडून सुरक्षित ठिकाणी हलवण्यात यावे (रेस्क्यू करावे), पिकांच्या झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी. "जर प्रशासनाने या रानटी गुरांचा तात्काळ बंदोबस्त केला नाही, तर येत्या काही दिवसांत घोटावडे आणि परिसरातील शेतकरी तीव्र जलसमाधी आंदोलन छेडतील," असा इशारा बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांनी दिला आहे. वन विभाग कृषी विभाग व महसूल विभाग यांनी समन्वयाने काम करावे अशी मागणी ही शेतकऱ्यांनी केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## महिला दिन व सावित्रीबाई फुले पुण्यतिथीनिमित्त महिलांचा सत्कार

पुणे (आरंभ पर्व) : महिला दिन आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून श्रुफिन वेलफेअर फाउंडेशनच्या वतीने स्वच्छता महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार व शिधा वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम पुणे महानगरपालिकेच्या सिंहगड क्षेत्रीय कार्यालयात पार पडला. या उपक्रमाचे आयोजन फाउंडेशनच्या संचालिका सविता रासोटे आणि विजय रासोटे यांच्या पुढाकारातून करण्यात आले. समाजाच्या स्वच्छतेसाठी निस्वार्थ सेवा देणाऱ्या महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे यावेळी आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाला पुणे महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार वाघमोडे, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक मंगलदास माने, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक आशिष सुपणार, तसेच आरोग्य निरीक्षक सूर्यभान शिक्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सन सिटी आरोग्य कोठीतील मुकादम गणेश भालशंकर, दशरथ साबळे आणि गणेश गायकवाड यांनीही कार्यक्रमात सहभाग नोंदवला. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन महिलांच्या सन्मानाचा आणि महिला सबलीकरणाचा संदेश या कार्यक्रमाच्या माध्यमातून देण्यात आला. महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांनी समाजासाठी केलेल्या योगदानाबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे कौतुक करून त्यांच्या कार्याला सलाम केला.



## आरोग्य शिबिर उत्साहात; आमदार भीमराव तापकीर यांची उपस्थिती

पुणे (आरंभ पर्व) : जागतिक महिला दिनानिमित्त पल्स मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या वतीने नऱ्हे येथे भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील महिलांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला. या शिबिरामध्ये ईसीजी (ECG), रक्तातील साखरेची पातळी (BSL), थायरॉईड तपासणी (TSH), संपूर्ण रक्त तपासणी (CBC), सिरम कॅल्शियम, हाडांच्या ठिसूळपणाची तपासणी (BMD), BMI व SpO2 अशा विविध तपासण्या करण्यात आल्या. केवळ १०० रुपयांच्या नोंदणी शुल्कात नागरिकांना या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या कार्यक्रमास खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव तापकीर प्रमुख उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती होण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी नगरसेवक हरिदास चरवड, नगरसेविका कोमल नवले, नगरसेविका जयश्री भूमकर, नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, गंगाधर भडावळे, बाळासाहेब नवले, मंडळ अध्यक्ष यशवंत लायगुडे, प्रभाग अध्यक्ष राजू कुटे , सुमित बेनकर,ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष रमेश गायकवाड , जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या आरोग्य शिबिरासाठी भाजप महिला मोर्चा उपाध्यक्ष सौ. कोमल सतीश कुटे , माजी उपसरपंच सतीश कुटे यांनी विशेष पुढाकार घेतला होता. नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.

## ट्रेडमार्क उल्लंघन प्रकरणी जेएसडब्ल्यूला न्यायालयाचा दिलासा



नाशिक (आरंभ पर्व) : जेएसडब्ल्यू स्टीलची पूर्ण मालकीची उपकंपनी जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्स लिमिटेड यांनी त्यांच्या नोंदणीकृत ट्रेडमार्कचा अनधिकृत वापर करणाऱ्यांविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयाकडून एकतर्फी अंतरिम मनाई हुकूम मिळवला आहे. हा आदेश ५ फेब्रुवारी २०२६ रोजी न्यायालयाच्या व्यावसायिक विभागाने दिला. हा मनाई हुकूम नाशिक जिल्ह्यातील लासलगाव आणि मनमाड परिसरातील पार्वती स्टील ट्रेडर्स, चामुंडा स्टील आणि आकाश स्टील पॉईंट या व्यावसायिकांवर देण्यात आला आहे. संबंधितांनी जेएसडब्ल्यूच्या 'कलरऑन+' आणि 'विश्वास+' या नोंदणीकृत ब्रँडशी साम्य साधणारे चिन्ह वापरल्याचे आढळले.

# ड्रेनेज व ओढ्यांच्या कामांची काकासाहेब चव्हाण यांची पाहणी





"प्रभागातील नागरिकांना पावसाळ्यात कोणताही त्रास होऊ नये यासाठी ड्रेनेज लाईन, नाले आणि ओढ्यांची वेळेत स्वच्छता व दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक आहे. कामांमध्ये कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. सर्व कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांनी तत्काळ कार्यवाही करावी," असे मत नगरसेवक काकासाहेब चव्हाण यांनी व्यक्त केले.

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक 33, मधील धायरी परिसरातील पावसाळी ड्रेनेज लाईन तसेच ओढ्यांच्या दुरुस्तीच्या कामांचा आढावा घेण्यासाठी प्रभाग क्रमांक ३३ चे नगरसेवक व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते काकासाहेब चव्हाण यांनी आज सकाळी संबंधित महापालिका अधिकारी आणि ठेकेदारांसोबत संयुक्त पाहणी केली. यावेळी प्रभागातील विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन प्रलंबित तसेच प्रस्तावित कामांची स्थिती तपासण्यात आली.

या पाहणीदरम्यान मागील काही कामांच्या दर्जाबाबत गंभीर त्रुटी निदर्शनास आल्या. पहिल्याच पावसात अनेक ठिकाणी ड्रेनेज चेंबर वाहून गेल्याचे तसेच काही ठिकाणी चेंबरची दिशा चुकीच्या पद्धतीने बसवण्यात आल्याचे आढळून आले. तसेच ड्रेनेज पाईपलाईनमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे अनेक ठिकाणी पाईप जाम झाल्याचेही स्पष्ट झाले.

याशिवाय प्रभागातील काही ओढ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा, झाडांची ओंडकी आणि झुडपे वाढल्यामुळे पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होत असल्याचेही यावेळी दिसून आले. त्यामुळे पावसाळ्यात पाणी पात्राबाहेर येण्याचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात आली.

काही ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकताना स्थानिक शेतकऱ्यांकडून अडथळे येत असल्याची माहिती ठेकेदारांनी दिली. यासंदर्भात संबंधित शेतकऱ्यांशी चर्चा करून लवकरात लवकर सकारात्मक मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही यावेळी सांगण्यात आले.

दरम्यान, पावसाळा सुरू होण्यापूर्वी प्रभाग क्र. ३३ मधील सर्व पावसाळी ओढे व नाले तातडीने स्वच्छ करून आवश्यक दुरुस्तीची कामे पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश काकासाहेब चव्हाण यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या.

यावेळी काकासाहेब चव्हाण यांनी अधिकाऱ्यांसोबत मॉर्निंग वॉक करत प्रभागातील विविध भागांची पाहणी केली.

## बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉइज वेल्फेअर ऑर्गनायझेशनचे २६ वर्षे समाजकार्य



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"शिक्षण नसल्याने नक्षलवाद फोफावला "असे मध्यप्रदेश येथील सामाजिक कार्यकर्त्या व नर्मदालय च्या भारती ठाकूर यांनी प्रतिपादन केले.भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉइज वेल्फेअर ऑर्गनायझेशन द्वारा आयोजित नवी पेठ येथील निवारा सभागृहात सामाजिक कृतज्ञता निधी समर्पण समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून भारती ठाकूर बोलत होत्या."आमच्या शाळांतून व्यवसायाभिमुख शिक्षण दिले जाते आणि आमचा अभ्यासक्रम आम्हीच बनवला असून गुरुकुल पद्धतीने शिक्षण दिले जाते.पाठांतरावर भर दिला जातो असे प्रतिपादन त्यांनी केले". बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी निधु सक्सेना ह्यांनी यावेळी आपले विचार मांडले. ते असे म्हणाले," बँक ऑफ महाराष्ट्रने प्रगतीचा खूप मोठा पल्ला गाठला आहे आणि बँक येत्या दोन ते तीन वर्षांत अजून प्रगतीची वरची श्रेणी मिळवायचा प्रयत्न करीत आहे."

सेवानिवृत्त बँक कर्मचाऱ्यांची "बोमरेओ" संघटना करीत असलेल्या कार्याची प्रेरणा घेऊन बँक देखील सामाजिक जबाबदारी म्हणूनअसे उपक्रम करायचा विचार करत आहे" असे निधु म्हणाले.

# महिलांच्या गटांना कर्ज देण्याच्या नावाखाली त्रास

- **बँकेचे नाव पुढे करून दबाव टाकणाऱ्यांवर कारवाईची हवेली पोलीस ठाण्यात मागणी**
- **महिलांना त्रास होत असेल तर दै. आरंभ पर्व महिलांचा प्रश्न माडण्यासाठी खंबीर**



**सिंहगड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

ग्रामीण भागातील शेतकरी व कष्टकरी महिलांना स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने विविध बँका व वित्तीय संस्थांकडून चार ते पाच महिलांचा गट तयार करून कर्ज वितरण केले जाते. मात्र या कर्जाच्या वसुलीच्या नावाखाली काही एजंटांकडून महिलांना मानसिक त्रास व अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याची गंभीर तक्रार समोर आली असून याबाबत संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी हवेली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

माहितीनुसार, महिलांचे बचत गट तयार करून त्यांना कर्ज दिले जाते आणि त्याचा दर महिन्याला हप्ता ठरवून घेतला जातो. अनेक महिला प्रामाणिकपणे हप्ते भरत असल्या तरी काही वेळा आर्थिक अडचणींमुळे किंवा इतर कारणांमुळे ठरलेल्या दिवशी हप्ता भरण्यास उशीर होतो. याच गोष्टीचा फायदा घेत काही वसुली करणारे एजंट बँकेचे नाव पुढे करून थेट महिलांच्या घरात जाऊन बसतात.

विशेष म्हणजे, अनेक वेळा त्या वेळी घरात पुरुष नसून फक्त महिला असतात. अशा परिस्थितीत हे एजंट महिलांशी उद्धट भाषेत बोलणे, आरडाओरडा करणे, पैसे दिल्याशिवाय घरातून न हलणे अशा प्रकारे दबाव टाकतात. "हप्ता द्या नाहीतर आमची नोकरी जाईल" असे सांगून महिलांना मानसिक त्रास देण्याचे प्रकार घडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या वागणुकीमुळे महिलांना अपमानास्पद परिस्थितीला सामोरे जावे लागत असून त्यांच्या सन्मानालाही धक्का बसत आहे.

ग्रामीण भागातील अनेक महिला शेतमजुरी करून किंवा छोट्या-मोठ्या कामांवर कुटुंब चालवत असतात. अशा महिलांना मदत करण्यासाठी दिलेले कर्जच आता त्यांच्या डोक्यावर ताण बनत असल्याची भावना व्यक्त होत आहे. कर्ज वसुली करताना नियमांचे पालन करणे आवश्यक असून कोणालाही घरात घुसून महिलांना त्रास देण्याचा अधिकार नसल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

या पार्श्वभूमीवर बँकेचे नाव वापरून महिलांना त्रास देणाऱ्या संबंधित एजंटांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, तसेच महिलांच्या सन्मानाचे रक्षण करावे अशी मागणी हवेली पोलीस ठाण्याकडे करण्यात आली आहे. स्थानिक महिला व नागरिकांनीही प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन अशा प्रकारांना आळा घालावा, अन्यथा महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. आशा प्रकारे कोणी महीलांना त्रास देत असेल कायदा पाळत नसेल घरात घुसून दादागीरीची भाषा करत असेल तर न घाबरता हवेली पोलीस ठाणे यांच्याकडे तक्रार करावी त्यांची चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल हवेली पोलीसांनी सांगितले.

# संकल्प इंटरनॅशनल स्कूलमध्ये महिला दिन उत्साहात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संकल्प इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'जागतिक महिला दिन' मोठ्या उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाद्वारे महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यात आला आणि समाजात स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने झाली.



कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून शाळेच्या संचालिका सौ. राधिका गिरमे उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व आणि स्वावलंबनावर भर दिला. शाळेतील विद्यार्थ्यांनी महिलांच्या सन्मानार्थ भाषणे, कविता आणि नाटिका सादर केल्या. विशेषतः थोर महिलांच्या वेशभूषेत आलेल्या चिमुकल्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या दिनाचे औचित्य साधून शाळेतील शिक्षिका आणि उपस्थित माता पालकांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. "स्त्री ही कुटुंबाचा आणि समाजाचा मुख्य आधार आहे. तिचा आदर करणे ही केवळ एका दिवसाची औपचारिकता नसून ती आपली संस्कृती असायला हवी," असे प्रतिपादन शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. शुभांगी पुदे आपल्या भाषणात केले.

महिला दिनानिमित्त शाळेत माता पालकांसाठी 'पाककला स्पर्धा', 'संगीत खुर्ची' आणि 'वक्तृत्व स्पर्धा' आयोजित करण्यात आल्या होत्या. विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चारुलता सूर्यवंशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. स्नेहल माळगे यांनी केले. या सोहळ्याला शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोठागुडेममध्ये इलेक्ट्रिशियन व डीलर्ससाठी प्युअरपॉवरचा विशेष कार्यक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रादेशिक ऊर्जा नेटवर्क अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने प्युअरपॉवरचे वितरक नेक्स्ट जेन एंटरप्रायझेस यांनी कोठागुडेम येथील हॉटेल थाटीपल्ली येथे इलेक्ट्रिशियन आणि डीलर्ससाठी विशेष कार्यक्रम आयोजित केला. खम्मम आणि भद्राद्री कोठागुडेम परिसरातील तांत्रिक आणि व्यावसायिक समुदायाला एकत्र आणण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात स्थानिक इलेक्ट्रिशियनसाठी तांत्रिक सेमिनार घेण्यात आला. यात प्युअरपॉवरच्या प्रगत तंत्रज्ञानासह AIS 156 टप्पा 2 सुरक्षा नियम, स्मार्ट-ग्रिड तंत्रज्ञान आणि सोलर-फर्स्ट प्रणालीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. त्यामुळे



स्थानिक घरांमध्ये ऊर्जा इंस्टॉलेशन अधिक प्रभावीपणे करता येईल, असे सांगण्यात आले. यानंतर संध्याकाळी डीलर मीट आयोजित करण्यात आली. या बैठकीत तेलंगणातील वाढत्या नवीकरणीय ऊर्जा बाजारातील संधींबाबत चर्चा झाली. प्युअरपॉवरचे 'मेड इन इंडिया' हार्डवेअर ग्राहकांना ऊर्जा स्वावलंबन मिळवून देण्यास आणि वीज खर्च कमी करण्यास मदत करू शकते, यावर भर देण्यात आला.

# एआयमुळे बदलणार जागतिक अर्थव्यवस्था

**पुणे/मुंबई- (दै. आरंभ पर्व)**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वेगाने जागतिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलत असून या बदलामागील पायाभूत सुविधा कोणत्या देशाला नेतृत्व मिळवून देतील हे ठरवतील, असे मत महाराष्ट्र शासनाचे मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केले.



CII Datacentre Blueprint Summit 2026 च्या ७व्या आवृत्तीत बोलताना त्यांनी सांगितले की, डिजिटल युगात डेटा सेंटर्स हे आधुनिक अर्थव्यवस्थेचे 'कारखाने' बनले आहेत. ते माहिती प्रक्रिया, साठवणूक आणि विश्लेषण करून डिजिटल अर्थव्यवस्थेला चालना देतात. या परिषदेत सरकारी अधिकारी, उद्योग क्षेत्रातील दिग्गज आणि तंत्रज्ञान तज्ज्ञांनी भारताला AI-आधारित डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी आवश्यक रोडमॅपवर चर्चा केली. महाराष्ट्र शासनाचे विकास आयुक्त डॉ. दीपेंद्र सिंह कुशवाह यांनी सांगितले की, मजबूत धोरणात्मक चौकट, पायाभूत सुविधा आणि कौशल्यसंपन्न मनुष्यबळामुळे भारत जागतिक गुंतवणुकीसाठी आकर्षक गंतव्य बनत आहे. डिजिटल परिवर्तनाला गती देण्यासाठी डेटा सेंटर्स, कनेक्टिव्हिटी आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सातत्यपूर्ण गुंतवणूक आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्र्यांचे मुख्य सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी एआयच्या युगात विस्तारक्षम आणि शाश्वत डिजिटल पायाभूत सुविधा उभारण्यासाठी सरकार आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्य महत्त्वाचे असल्याचे सांगितले. दरम्यान, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनीही डेटा सेंटर्स, क्लाऊड सेवा आणि उच्च-गती नेटवर्क हे भारताच्या दीर्घकालीन आर्थिक वाढीचे प्रमुख आधारस्तंभ ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.

## शेतमालाचे बाजारभाव पडले

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

अमेरिका, इस्रायल, इराण युद्धाची सध्याची परिस्थिती यामुळे व्यावसायिक सिलेंडरवर आलेले निर्बंध. यामुळे साधारणपणे पन्नास टक्के हॉटेल व्यवसायावर परीणाम होऊन सिलेंडर मिळत नसल्याने बऱ्याच हॉटेल व्यावसायिकांनी हॉटेल बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्याने त्याचा फटका बळीराजाला बसत आहे.मार्केटमध्ये आवक जास्त आणि मागणी कमी अशीच अवस्था आहे.त्यामुळे इतक्या कडक उन्हाळ्यात मेथी, कोथिंबीर,शेपू,पालक, कांदापात अशा भाजीपाल्याला दोन रुपयांपासून ते पाच रुपयांपर्यंत असा मातीमोल बाजारभाव मिळत आहे. उत्पादन खर्चही वसुल होत नाही.त्यामूळे बळीराजावर उपासमारीची वेळ आली आहे.सरकारने जुलै २०२५ पर्यंतच्या पिक कर्जाला कर्जमाफी दिली आहे.

# मोफत आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक महिला दिनानिमित्त वडगाव बुद्रुक येथे शासकीय योजनांची माहिती देणारे तसेच मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम सिंहगड रोड परिसरातील भैरवनाथ मंदिराजवळील कर संकलन इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर पार पडला. या कार्यक्रमात भाग जनसेविका सौ. नयन चव्हाण यांनी उपस्थित महिलांना 'अनुलोम' उपक्रमाची सविस्तर माहिती देत विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केले. महिलांनी शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, यासाठी त्यांनी योजनांची माहिती सोप्या पद्धतीने समजावून सांगितली. कार्यक्रमात आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात सांधेदुखी, गुडघेदुखी तसेच इतर सामान्य



आजारांची तपासणी करण्यात आली. यावेळी महिलांची जनरल हेल्थ चेकअप करून आवश्यक औषधे व गोळ्या मोफत देण्यात आल्या. या शिबिरात एकूण ५२ महिलांनी सहभाग नोंदवून आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेले डॉ. नितीन झोगडे (संयोगी संस्था समन्वयक, कात्रज विभाग) यांनी विविध आजारांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच कमी खर्चात बाळासाहेब देवरस हॉस्पिटल येथे आवश्यक वैद्यकीय तपासण्या करून घेता येतील, अशी माहितीही त्यांनी महिलांना दिली. कार्यक्रमात श्री. संदीप मुकुंद हरसुले (प्रशासन अधिकारी, बाळासाहेब देवरस पॉलीक्लिनिक व डायग्नोस्टिक सेंटर) यांचीही उपस्थिती होती. त्यांनी आरोग्य सेवांबाबत माहिती दिली. उपस्थित नर्सिंग स्टाफनेही सर्व महिलांची तपासणी करून योग्य प्रकारे उपचार व मार्गदर्शन केले. या शिबिराला अनुलोमच्या अनेक कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. त्यामध्ये सौ. स्वाती रायकर (वडगाव), सौ. भाग्यश्री पुणेकर (कात्रज), सौ. मीनाताई शेळके (शिवणे), सौ. अश्विनी गिरी (उत्तमनगर), सौ. सायली भोसले (कोंडवे धावडे) यांचा समावेश होता. तसेच सामाजिक कार्यकर्ते श्री. दिलीप रायकर (धायरी) आणि श्री. तानाजी कांबळे (नऱ्हे) हेही कार्यक्रमाला उपस्थित होते. महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमामुळे महिलांना आरोग्य तपासणीचा लाभ मिळाला तसेच शासकीय योजनांची उपयुक्त माहिती मिळाल्याने उपस्थित महिलांनी समाधान व्यक्त केले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.